# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १६/०४/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद वाहनासह एकूण ७१२०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १५/०४/२०२४ रोजी खापरखेडा येथील स्टाफ पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, वलनी रोड ते पिपळा फाटा रोड सावनेर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेती ट्रक मध्ये लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून वलनी रोड ते पिपळा फाटा रोड सावनेर येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम एच ४०/एन ३७२७ यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता सदर वाहनात ३ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालक **आरोपी किशोर शामलाल पटले, वय ५५ वर्ष रा. महादुला कोराडी** यास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्र. एम एच ४०/एन ३७२७ किंमती ७०००००/—रु मध्ये ३ ब्रास रेती किंमती १२०००/— रु. असा एकुण ७१२०००/— रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, डॉ. संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधीकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा ठाणेदार धनाजी जळक यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी केली.

**पो.स्टे. काटोल हद्दीमधील येथील IPL क्रिकेट सट्टयावर धाड**

**—: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—**

दिनांक १४/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील भाजीपाणी शिवारातील ग्लोबल फार्म हाऊस येथे काही इसम अवैधरीत्या IPL मधील मुंबई इंडियन्स वि. चेन्नई सुपर किंग्स दरम्यान सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यावर जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला प्राप्त झाले वरून सदर पथकाने भाजीपाणी शिवारातील ग्लोबल फार्म हाऊस येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) चंदु गंगाधर चांदेकर रा. सुजाता नागपुर २) टोनि पठाण रा. कामठी रोड ह. मु. जुनापानी नागपुर ३) अशद ईरशाद खान रा. ताज टोल नाका नागपुर** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०३ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन TV, Set Top बॉक्स, Jio राउटर, ५ नग मोबाईल संच, लॅपटॉप व इतर साहित्य असा एकूण १,१६,४०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे काटोल येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंह ठाकूर, ASI चंद्रशेखर घडेकर, HC प्रमोद ताभने, HC संजय बांते, HC दिनेश आधापुरे HC रणजीत जाधव, HC मिलिंद नांदूरकर, HC अमोल कूथे, NPC अमृत किनगे, PC सुमित बांगडे, WHC नम्रता बघेल, WHC वणीता शेंडे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**